| | | |
|---|---|---|
| MHKO050031572025 | **नियमित दिवाणी दावा क्र. २३०/२०२५ मधील नि.१ खालील आदेश** | **कलगोंडा पाटील तर्फे मयत वारस वि. सुरेश बाबू मोरे आणि इतर** |

प्रस्तुतचा दावा हा वादीने प्र.वादी विरूध्द निरंतर मनाईचा मौजे हातकणंगले येथील क.ग.नं.२६९ च्या मिळकतीविरूध्द दाखल केलेला आहे. यातील प्र.वादीने मौजे हातकणंगले येथील क.ग.नं.२७० या मिळकतीबाबत मा. दिवाणी न्यायालय, व.स्तर, इचलकरंजी यातील वादी विरूध्द न्यायालयात दाखल केला आहे व त्यामध्ये न्यायालयाने वादी यांना आहे ती परिस्थिती (status quo) कायम ठेवण्याचा आदेश केला आहे. दोन्ही मिळकती लगत आहेत व रस्तयाबाबत दोन्हीमध्ये वाद आहे. या न्यायालयातील प्रकरणामध्ये प्रतिवादीने नि.२६ ला अर्ज दाखल केलेला आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, वादी व प्र.वादी यांच्या दरम्यान रे.क.नं.५८/२०२५ हा दावा मा. दिवाणी न्यायालय, व. स्तर, इचलकरंजी यांच्याकडे चालू आहे. सदर प्रकरण व रे.क.नं.५८/२०२५ चे प्रकरण एकत्रात चालायचे आहे त्याबाबत आवश्यक ते आदेश व्हावेत. प्र.वादीने अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, सदर मजकुराचा अर्ज दि.१५/०७/२०२५ रोजी दिलेला आहे. सदर अर्जावर म्हणणे देणेकरिता म्हणून वादीच्या वकीलांनी अर्ज घेतला होता मात्र सदरचा अर्ज या प्रकरणामध्ये दिसून येत नाही. अनावधानाने सदर अर्ज सदर प्रकरणात सामिल होण्याचे राहून गेलेले दिसते व त्यासोबत त्यांनी दि.१५/०७/२०२५ रोजीचा अर्ज मा. दिवाणी न्यायालय, व. स्तर, इचलकरंजी यांच्याकडे दिल्याची प्रत दाखल केलेली आहे. त्या प्रतीवर कोणाचीही सही दिसून येत नाही. मा. दिवाणी न्यायालय, व.स्तर, इचलकरंजी यांच्याकडून प्र.वादीने दि.१५/०७/२०२५ रोजी दिलेल्या अर्जाबाबत आजतागायत या न्यायालयास कोणताही खुलासा मागविण्यात आलेला नाही. मा. जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर परिपत्रक क्र. २४/२०२२ दि.१८/११/२०२२ रोजी पारीत केलेल्या परिपत्रकानुसार

असे आदेशीत केले आहे की, संलग्न प्रकरणे ज्या वेगवेगळया न्यायालयात असतात त्यातील ज्येष्ठतम न्यायीक अधिका–यांच्या न्यायालयामध्ये संबंधित पक्षकार यांनी अर्ज देवून त्यासोबत संलग्न प्रकरणाची दयावी. त्यानंतर संबंधित अधिका–यांनी अर्जाप्रमाणे दिलेल्या माहितीची खात्री करून आपल्या अभिप्रयासह प्रस्ताव जिल्हा न्यायालयाकडे पाठवावे असे निर्देशित करण्यात आले आहे. सदर परिपत्रकाची प्रतिवादी यांनी पुर्तता केलेली दिसून येत नाही. प्रस्तुतचे प्रकरणे हे नि.५ चे चौकशीकामी नेमण्यात आले आहे. त्यामुळे सदरच्या प्रकरणात गुणवत्तेवर न जाता दोन्ही पक्षकारांना वाद मिळकतीची आहे ती परिस्थिती ठेवण्याबाबत निर्देष पुढील आदेशापर्यंत देणे न्यायोचीत होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करावी.

**आदेश**

१. वादी व प्रतिवादी यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी दावा मिळकतीची आहे ती परिस्थिती पुढील आदेशापर्यंत ठेवण्यात यावी.

२. प्रतिवादी यांनी मा. जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर परिपत्रक क्र. २४/२०२२ दि.१८/११/२०२२ रोजी पारीत केलेल्या परिपत्रकानुसार पुर्तता करावी.

३. वादी व प्रतिवादी यांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

Digitally signed by DATTATRAY BHAGWAN SATHE
Date: 2025.10.03 16:39:00 +0530

**दिनांक– ०३/१०/२०२५**
**इचलकरंजी.**

**(डी. बी. साठे)**
**२ रे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,**
**इचलकरंजी, जि.कोल्हापूर**